
# e-Jalaseva Bulletin

## Water Recourses Department Government of Maharashtra

NOVEMBER, 2014 VOLUME-IV ISSUE-VII


जलसंपदा विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी वर्गाला दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !





### संपादकिय


श्री. टी .एन. मुंडे,

मुख्य अभियंता व सहसचिव, मंत्रालय मुंबई


जलसंपदा विभागाने दि. १५ सप्टेंबर ते १५ ऑक्टोंबर २०१४ या कालावधीमध्ये ई-जलसेवा अभियान राबविण्याबाबत शासन निर्णय निर्गमित केला होता. मागील वर्षी देखील आपण हा उपक्रम राबविला होता. या वर्षी सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभुमिवर निवडणुकीच्या कामकाजात सहभागी असताना देखिल आपणा सर्वांकडून सन २०१४ च्या ई जलसेवा अभियानास सकारात्मक प्रतिसाद मिळाला याबद्दल धन्यवाद. या अभियानादरम्यान घेण्यात आलेल्या Best Dashboard, Poster व Calendar या स्पर्धांना देखील चांगला प्रतिसाद लाभला. सदर स्पर्धांमध्ये भाग घेतलेल्या व विजयी झालेल्या सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे हार्दिक अभिनंदन.

अभियान कालावधीत आपण पडताळणी, वापर, प्रोत्साहन व कौशल्य विकसन या चतु:सूत्रीच्या आधारे काम केले आहे व ते आपणास यापुढेही चालू ठेवायचे आहे. या महिन्यात वाल्मी, औरंगाबाद येथे दीर्घकालीन प्रशिक्षण घेत असलेल्या प्रशिक्षणार्थींना ई जलसेवाअंतर्गत दोन दिवसीय प्रशिक्षण देण्यात आले. प्रकल्प व्यवस्थापन कार्यालय, पुणे यांनी नियोजन केलेला ई जलसेवा प्रकल्पाच्या आतापर्यंतच्या वाटचालीवर आधारित माहितीपट तयार झाला असून तो आपणास प्राथमिक स्तरावर सर्व प्रादेशिक प्रशिक्षण केंद्रांकडे पाहता येईल. तसेच उपअभियंता यांच्या STeDE प्रशिक्षणाप्रमाणेच सर्व स.अ.२/शाखाअभियंता यांचे ई जलसेवाअंतर्गत प्रशिक्षण मेटा, नाशिक येथे घेण्याचे लवकरच निश्चित करण्यात येत आहे.

त्याचबरोबर आपले अंतिम ध्येय शेवटच्या घटकापर्यंत म्हणजेच "शेतकरी" याच्यापर्यंत पोचणे हे आहे. मा.प्रधान सचिव यांनी अभियान कालावधीत आवाहन केल्याप्रमाणे काही नविन संकल्पना (Innovative Ideas) सुचविणे आपणा सर्वांकडून अपेक्षित आहे. अधिक प्रभावशाली इनोव्हेशनकडे आपण कशी वाटचाल करू शकतो? नाविन्यपूर्ण गोष्टींचा शोध घेणे आणि अशक्य वाटणाऱ्या बाबी शक्य करून दाखवणे हे आपल्या पुढील आव्हान आहे. नविन बदलाबाबत आपण सर्वांच्या पुढे एक पाऊल राहूया व एक नविन आदर्श निर्माण करूया. वेगळ्या वाटेवरचा हा प्रेरणादायी प्रवास आपण सर्वांनी मिळून करूया. हा अनुभव निश्चितच आपणाला समृद्ध करणारा असेल याबाबत तिळमात्रही शंका नाही.



# e-Jalseva Bulletin

## Water Recourses Department Government of Maharashtra

NOVEBER, 2014 VOLUME-IV ISSUE-VII

## ई - सेवा पुस्तक

श्रीमती धनश्री लिमये, सहा. अभि. श्रेणी-१

ई प्रशासन प्रकल्प व्यवस्थापन कार्यालय, पुणे

जलसंपदा विभागातील सर्व कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांचे सेवा विषयक माहितीकरीता “ई-सेवा पुस्तक” या प्रणालीचा वापर अनिवार्य करण्यात येत आहे. सदर प्रणालीतील उपलब्ध माहितीच्या आधारे शासन स्तरावरील विविध कार्यवाही पार पडणार असून, सदर माहिती अधिकृत मानण्यात येईल. सदर प्रणाली ही जलसंपदा विभागाच्या अखत्यारीत असलेल्या सर्व कार्यालयांसाठी राबविण्यात येणार आहे. यामध्ये सर्व महामंडळे/मेरी/वाल्मी/ मुख्य अभियंता (स्थापत्य/विद्युत/ यांत्रिकी) आदी कार्यालये आणि त्यांचे अधिनस्त असलेली सर्व कार्यालये यांचेसाठी लागु राहील. सदर प्रणाली दि. ३१ डिसेंबर २०१५ या दिनांकानंतर निवृत्त होणाऱ्या सर्व वर्गातील अथवा सर्व गटातील सर्व प्रकारच्या (स्थायी / अस्थायी / परीविक्षाधीन / रु.अ.आ) अधिकारी/कर्मचारी यांचेकरीता लागु राहील.

ई-सेवा पुस्तक वापरण्यासाठी अधिकारी/ कर्मचारी यांना लॉगीन आयडी व पासवर्ड देण्यात येईल. त्या आधारे प्रणालीमध्ये माहिती भरणे व ती अचुक असल्याची खातरजमा करणे तसेच प्रणालीचा पासवर्ड सुरक्षित ठेवणे, तो वेळोवेळी बदलणे आदी जबाबदारी संबंधित अधिकारी/कर्मचारी यांची राहील. अधिकारी/ कर्मचारी यांनी भरलेली माहिती ही संबंधित DDO तसेच कार्यालय प्रमुख यांनी पडताळणी केल्यानंतर गोठविण्यात येईल व त्यात नंतर बदल करता येणार नाही. अशा प्रकारे माहितीची पडताळणी करण्याची कार्यवाही विहित कालवधीमध्ये करणे तसेच त्यांना याकामी दिलेले लॉगीन आयडी व पासवर्ड सुरक्षित ठेवणे व तो वेळोवेळी बदलणे ही जबाबदारी त्यांची राहील.

सदर प्रणालीमध्ये विविध प्रकारच्या रजेबाबतच्या नोंदी भरताना दि. १ जानेवारी २०११ नंतरच्याच नोंदी भरण्यात याव्यात. तर प्रशिक्षणाबाबतच्या नोंदी भरताना शासन सेवेमध्ये प्रवेश केल्यापासुन आजतागायतच्या सर्व नोंदी घेण्यात याव्यात. विभागामध्ये नव्याने नियुक्त झालेल्या अधिकारी/कर्मचारी यांचेकरीता नव्याने ई-सेवा पुस्तक तयार करण्यासाठी कोयना संकल्पचित्र मंडळ, पुणे यांना कळविण्यात यावे. सदर प्रणालीमध्ये ज्या-ज्या अधिकारी/कर्मचारी यांना आरहक व संवितरण अधिकारी यांचे मार्फत वेतन अदा केले जाते त्या सर्वांची माहिती भरणे आवश्यक असुन, अशा प्रकारची कार्यवाही त्यांचे मार्फत होणे आवश्यक आहे.



ई - जलसेवा अभियाना अंतर्गत VC द्वारे विविध क्षेत्रांतील मान्यवरांची व्याख्याने आयोजित करण्यात आली.



ई-जलसेवा अभियाना अंतर्गत आयोजित करण्यात आलेल्या विविध स्पर्धांबाबत VC द्वारे मार्गदर्शन करताना ई-प्रशासन प्रकल्प व्यवस्थापन कार्यालयातील अधिकारी.



ई-जलसेवा अभियानाच्या उद्‌घाटन प्रसंगि माननीय प्रधान सचिव, जलसंपदा यांनी VC द्वारे जलसंपदा विभागाच्या अधिकारी व कर्मचारी वर्गाला संबोधित केले.

# e-Jalseva Bulletin

Water Recourses Department Government of Maharashtra

NOVEMBER, 2014 VOLUME-IV ISSUE-VII


********* हार्दिक अभिनंदन *********

| अ. क्र. | स्पर्धा प्रकार | प्रथम क्रमांक प्राप्त अधिकारी/ कर्मचारी यांचे नाव व पदनाम | |
|---|---|---|---|
| १. | Best Dashboard | तुषार चिनावलकर<br>सहाय्यक अभियंता श्रेणी-१<br>जळगाव मध्यम प्रकल्प विभाग, जळगाव |  |
| २. | Best Calendar | दत्तात्रय इंदुलकर<br>शाखा अभियंता<br>सांगली पाटबंधारे विभाग, सांगली |  |
| ३. | Best Poster | एस. एन. राठोड<br>सहाय्यक अभियंता श्रेणी-२<br>औरंगाबाद पाटबंधारे मंडळ, औरंगाबाद |  |

## गुण नियंत्रण मंडळ, पुणे

**दि.१५ सप्टेंबर २०१४ ते १५ ऑक्टोंबर २०१४ या दरम्यान राबविलेले ई-जलसेवा अभियान**

१) मुख्य संकेतस्थळासाठी गुण नियंत्रण मंडळ, पुणे यांचा तपशील पुरविणेत आला.

२) माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये प्रसिध्द करावयाची माहिती भरुन मुख्य संकेतस्थळावरती अपलोड करण्यात आली.

३) निरीक्षण टिप्पण्या व ओके कार्ड बाबतचा तपशील ई-जलसेवा प्रणालीत भरणेत आला.

४) या मंडळांतर्गतच्या सर्व ५ विभागाचे सप्टेंबर २०१४ चे मासिक लेखे विहीत दिनांकापुर्वी महालेखापाल यांना सादर करण्यात आले.

५) गुण नियंत्रण संदर्भातील सर्व शासन निर्णयांचे एकत्रीकरण (GR Consolidation) सर्वसमावेशक एक शासन निर्णय तयार करण्याचे काम पूर्ण करण्यात आले.

६) मंडळ कार्यालय स्तरावर नाविन्यता गट ( Innovation Committee ) स्थापन करण्यात आला असून व या समितीच्या दोन बैठका घेण्यात आल्या. तसेच ऑक्टोंबर महिन्यातील नाविन्यता कल्पना ( Innovation Idea ) सुचविण्यात आली.

७) ई-सेवापुस्तक प्रणाली संदर्भात मंडळातील सर्व आहरण व संवितरण अधिका-यांची ई-जलसेवा प्रणाली अंतर्गत नोंदणी पूर्ण करण्यात आली.

८) अभियंता दिन विशेष कार्यक्रमाचे आयोजन करुन स्व. सर विश्वेशरैय्या यांची चित्रफीत दाखविण्यात आली.

९) मासिक आढावा बैठकीत ई-जलसेवा प्रणाली अंतर्गत पूर्ण झालेल्या व करावयाच्या कार्यवाहीबाबत चर्चा व नियोजन करण्यात आले व मॉड्युल निहाय अढावा घेण्यात आला.

१०) ई जलसेवा अभियाना दरम्यान विविध प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले

### e-Jalseva News

1. e-Jalseva Abhiyan completed successfully
2. E Service book project has launched successfully with link for DDO Registration
3. PUSH SMS service has been activated for Khulgapur barrage, Latur
4. MWRD selected data is being shared with Maharashtra State Data Bank


Editor
T. N. Mundhe

Executive Editor
Pravin kolhe

Editorial Board
Mrs. Purnima Desai
Mr. Avinash Patil
Mrs. Dhanshree Limaye
Mr. Prashant Kadam
Mr. Nandkishor Ranaware



**E-GOVERNANCE PROJECT MANAGEMENT OFFICE,**
Koyna Design Circle,
Jalsampatti Bhavan,
Near Karve Statue, Kothrud, Pune
Phone NO: 020-25468982
Fax: 020-25445763
E-Mail: egovpmo@wrd.maharashtra.gov.in